# व्हेनीसचा व्यापारी (Merchant of Venice): विल्यम शेक्सपियर

मराठी कथारूप अनुवादः प्रा. डॉ. बिंदुमाधव जोशी

**प्रास्ताविकः**

शेक्सपियरची बरीच नाटके इटलीच्या पार्श्वभूमीवर - व्हेनीस, व्हेरोना, रोम, नेपल्स - लिहिली गेली आहेत. शेक्सपियरने या शहरांना कधी भेट दिल्याचे त्याच्या चरित्रात उल्लेख सापडत नाहीत. पण या शहरांना भेट देऊन आलेले लोक त्याला भेटले असण्याची दाट शक्यता आहे. त्यांच्याकडून मिळवलेली माहिती त्याने इतकी रेखीवपणे वापरली आहे की या शहरांचे वातावरण इटालियन लोकांनासुद्धा मोहित करते. मिळालेल्या थोड्याशा माहितीवर सुद्धा शेक्सपियर आपल्या प्रतिभेने वास्तवतेचा साज कसा सजवत होता हे पाहून आपली मती कुंठित होते. चला तर परत एकदा सुंदर आणि समृद्ध व्हेनीसला!

**प्रमुख पात्रेः**

| | |
|---|---|
| अँटोनिओः | व्हेनीसचा व्यापारी |
| बसॅनिओः | अँटोनिओचा उधळा, जिवलग, उमराव मित्र |
| ग्रॅशियानोः | बसॅनिओचा सहकारी, सोबती |
| शायलॉकः | व्हेनीसमधील ज्यू सावकार, धनलोभी, कंजूष |
| पोर्शियाः | सुंदर, श्रीमंत, उमराव स्त्री |
| नेरिसाः | पोर्शियाची सखी, सेविका |
| ड्यूकः | व्हेनीसचा अधिपती, न्यायाधीश |
| जेसिकाः | शायलॉकची एकुलती कन्या |
| लोरेंझोः | जेसिकाचा ख्रिश्चन प्रेमी/पती |

**कथानकः**

व्हेनीस या शहरात अँटोनिओ नावाचा एक ख्रिश्चन व्यापारी राहात होता. अनेक देशांशी त्याचा समुद्रमार्गे व्यापार चालू असतो. तो अतिशय दयाळू व उदार स्वभावाचा होता. गरजू लोकांना तो कमी व्याजाने, काही वेळा बिनव्याजी उसने पेसे देत असे. याउलट व्हेनीसमध्ये सावकारी व्यवसाय करणारा शायलॉक चढ्या दराने गरजूंना कर्ज देऊन गबर झालेला होता. तो खूप कंजूष होता; आपल्या मुलीला सुद्धा पैसे देताना तो कां-कू करी. तो ज्यू असल्यामुळे व त्याच्या लोभी स्वभावामुळे त्याची व ख्रिश्चन धर्माच्या अँटोनिओची नेहमी खटाखटी होत असे. अँटोनिओ सर्वांच्यादेखत 'कुत्र्या, नालायका' अशा शब्दांनी शायलॉकची अवहेलना करीत असे. शायलॉक त्यावर उघडपणे फारशी प्रतिक्रिया व्यक्त करीत नसे, पण त्याच्या मनातील प्रतिस्पर्ध्याची भावना वैरात, सूडभावनेत प्रतीत होत असे.

बसॅनिओ हा उधळ्या उमराव युवक अँटोनिओचा जिवलग मित्र होता. त्याच्यासाठी अँटोनिओचे मैत्रीचे/मदतीचे दरवाजे कायम उघडे असतात. एके दिवशी बसॅनिओ अँटोनिओकडे एक खास कामासाठी मदत मागायला येतो ...

व्हेनीस पासून थोड्या अंतरावर असलेल्या बेल्मॉंट या शहरी पोर्शिया या नावाची एक सुंदर, श्रीमंत, उमराव युवती राहात होती. तिच्याशी विवाह करण्याच्या इच्छेने देशोदेशीचे उमराव, राजपुत्र तिच्या दारी पायधूळ झाडत असत, पण त्यापैकी एकही तिला पसंत पडत नसल्याने ती त्यांना वाटाण्याच्या अक्षता लावत असे. बसॅनिओची व तिची जुनी ओळख होती व बसॅनिओ तिला पसंतही होता. पण तिला मागणी घालण्याइतपत त्याची आर्थिक परिस्थिती नसल्याने त्याची हिंमत होत नव्हती. पण एके दिवशी धीर करून तो अँटोनिओकडे आला व ही सर्व पार्श्वभूमी सांगून अँटोनिओकडे त्याने आर्थिक मदतीची ३००० ड्यूकटची [त्या वेळचे रुपया सारखे नाणे] मागणी केली.

अँटोनिओकडे त्यावेळी एवढे पैसे नव्हते. त्यामुळे नाईलाजाने शायलॉककडून कर्ज घ्यायचे ठरते. अँटोनिओ व बसॅनिओ त्याच्याकडे पैसे मागायला आले आहेत हे शायलॉकला कळताच सुडाची संधी मिळाली म्हणून तो अंतर्यामी खूष होतो, पण वरकरणी मात्र तो थोडी नाखुषी दाखवत कर्ज देण्याचे कबूल करतो. ३ महिने मुदतीचे ३००० ड्यूकट कर्ज बिनव्याजी देण्याचा उदारपणा तो दाखवतो. फक्त ३ महिन्याच्या आत हे कर्ज परत न केल्यास अँटोनिओच्या हृदयाजवळचे एक पौंड मांस काढून घ्यायची अट तो सुचवतो. हे सगळे हसत खेळत गंमत म्हणून आहे असे तो भासवतो - "एखाद्या माणसाच्या १ पौंड मांसाचा मला काय फायदा? शेळी बकरीचे असते तर खाता तरी आले असते". बसॅनिओ या अटीवर कर्ज घ्यायला साफ नकार देतो. पण अँटोनिओला आपली जहाजे २ महिन्यांच्या आतच येतील व कर्जाच्या दसपट रक्कम हातात असेल अशी खात्री असल्यामुळे तो बसॅनिओची समजूत घालतो व लेखी करारनामा पूर्ण करून कर्ज घेतो.

पोर्शियाचे वडिल मरताना तिच्या लग्नासाठी एक स्वयंवरासारखा 'पण' ठरवून गेलेले असतात. तिची संपत्ती व रूप यावर भाळून अनेक युवक तिला मागणी घालतील, पण तिच्या संपत्तीचा लोभ न धरणारा सद्गुणी सुविचारी पती तिला मिळावा या हेतुने त्यांनी एक योजना ठरवलेली असतेः एका छोट्या खोलीत तीन लहान बंद पेट्या ठेवलेल्या असतात. एकीला सोन्याचे झाकण, दुसरीला चांदीचे तर तिसरीला कथिलाचे झाकण असते. या तिन्ही पेट्यांपैकी एका पेटीत पोर्शियाचे छायाचित्र [पोर्ट्रेट] ठेवलेले असते. जो ती पेटी बरोबर उघडेल तिच्याशी पोर्शिया लग्न करेल असा तो 'पण' असतो. प्रत्येकाला एकच संधी असते. प्रत्येक पेटीवर एक मार्गदर्शक सूचना असते; सोनेरी पेटीवर 'अनेक लोकांना जे हवे असते ते मला निवडणाऱ्याला मिळेल; चांदीच्या पेटीवर 'जो मला निवडेल त्याला त्याच्या योग्यतेप्रमाणे मिळेल' व कथिलाच्या पेटीवर 'मला निवडणाऱ्याने आपले सर्वस्व देण्याची व सर्व धोका पत्करण्याची तयारी ठेवली पाहिजे'. ही लॉटरी अजमाव्या लागणाऱ्या प्रत्येक इच्छुक उमेदवाराला तीन अटींचे पालन करण्य़ाची शपथ घ्यावी लागे. त्या अटी अशाः

१) आपण केलेली निवड कोणालाही सांगायची नाही.

२) निवड चुकल्यास दुसऱ्या कोणत्याही स्त्रीला विवाहाचा प्रस्ताव करायचा नाही; आयुष्यभर अविवाहित रहायचे.
३) निवड चुकल्यास ताबडतोब वाडा सोडून निघून जायचे; परत येथे यायचे नाही.

पोर्शियाला पसंत असणाऱ्या इच्छुकालाच हा प्रयत्न करण्याची संधी मिळत असे.

पैसे मिळवल्यानंतर बसॅनिओ सर्व तयारी करून बेल्मॉंट येथे पोर्शियाला भेटायला येतो. त्याच्या बरोबर त्याचा जिवलग सहकारी ग्रॅशियानो असतो. पोर्शियाला बसॅनिओ आवडत असल्याने ती त्याचे आनंदाने स्वागत करते. बरेच दिवस तिचा प्रेमळ पाहुणचार घेतल्यानंतर तो लग्नाची लॉटरी अजमावण्याचा आग्रह धरतो. पोर्शिया नाईलाजाने त्याला संमती देते. सुदैवाने तो बरोबर कथिलाची पेटी उघडतो व त्याला पोर्शियाचे छायाचित्र (portrait) मिळते. निवड बरोबर झाल्याने दोघांनाही आनंद होतो; त्या दोघांचा विवाह निश्चित होतो. त्याचवेळी ग्रॅशियानो नेरिसाबरोबर (पोर्शियाची सखी) विवाह करण्याची संमती मागतो. यथावकाश दोन्ही विवाह थाटामाटाने साजरे होतात.

लग्नाचा जल्लोष थोडा कमी झाल्यानंतर एके दिवशी दोन्ही जोडपी गप्पा मारत बसलेले असताना पोर्शिया आपली अंगठी बसॅनिओला देते व त्याच्याकडून वचन घेते की तो ती अंगठी कधीही आपल्या बोटातून काढणार नाही. नेरिसाही लगेच आपली अंगठी ग्रॅशियानोला देते व त्याच्याकडूनही तसेच वचन घेते. एवढ्यात व्हेनीसहून एक दूत बसॅनिओसाठी एक तांतडीचे पत्र घेऊन येतो. बसॅनिओचा चेहरा पत्र वाचता वाचताच काळवंडून जातो. काहीतरी भयानक, अशुभ घडले आहे याची कल्पना पोर्शियाला येते. पत्र अँटोनिओचे असते -- ३ महिन्यांची मुदत संपलेली असते; अँटोनिओची सर्व जहाजे दुर्दैवाने समुद्रात नष्ट झालेली असतात. निष्कांचन झालेला अँटोनिओ कराराप्रमाणे शायलॉकच्या हातून मृत्युमुखी पडणार असतो. ड्यूकपुढे हा खटला उभा राहिलेला असतो व व्हेनीसच्या कायद्यानुसार अँटोनिओला आपल्या हृदयाजवळचा एक पौंड मांसाचा तुकडा शायलॉकला देणे भाग असते. शायलॉक कराराशिवाय दुसरे काहीही ऐकायला तयार नसतो. जमल्यास मरणापूर्वी बसॅनिओने भेटावयास यावे अशी इच्छा अँटोनिओने पत्रात व्यक्त केलेली असते.’ बसॅनिओ वज्राघात झाल्यासारखा सुन्न होऊन बसतो. पोर्शियाला सर्व प्रकार कळताच त्याला ताबडतोब हवे तेवढे पैसे - दुप्पट, तिप्पट, दसपट - रक्कम शायलॉकला देऊन मित्राला वाचवण्यासाठी पाठवते. तो व ग्रॅशियानो व्हेनीसला रवाना होताच लगेचच पोर्शिया नेरिसाला घेऊन व्हेनीसला जायला निघते. तिच्या डोक्यात एक योजना स्फुरलेली असलेली असते. व्हेनीस मध्ये तिचा आत्येभाऊ नामवंत कायदेपटू असतो व बहुतेक वेळा ड्यूक त्याला न्यायदानाच्या कामात मदत करायला बोलवत असे. दोघीजणी पुरूषवेष धारण करून नवऱ्यांच्या आधीच व्हेनीसमध्ये दाखल होतात व भावाची भेट घेऊन न्यायालयात येतात. पुरूषवेषातील पोर्शिया ड्यूकला भावाचे पत्र देते. त्या पत्रातील शिफारशीनुसार ड्यूक तिला अँटोनिओच्या वकीलाची जागा घेण्यास सांगतो. त्यांचे वेषांतर इतके बेमालूम असते की बसॅनिओ व ग्रॅशियानो त्यांना ओळखू शकत नाहीत.

दरम्यान बसॅनिओ शायलॉकला हवे तेवढे पैसे देण्याची तयारी दर्शवतो, पण शायलॉक कराराप्रमाणे एक पौंड मांसाचा हेका धरतो. हा सबंध प्रवेश [Act 4, Scene 1] म्हणजे पोर्शियाच्या बुद्धिमत्तेची कमाल आहे, तिच्या वकिली कौशल्याची धमाल आहे. एका बाजूला ती शायलॉकची मागणी व्हेनीसच्या कायद्यानुसार अगदी बरोबर आहे असे मान्य करते. केलेल्या करारानुसार अँटोनिओने त्याला आपल्या हृदयाजवळचा मांसाचा तुकडा दिलाच पाहिजे असे ती अँटोनिओला बजावते. बिचारा अँटोनिओ आपल्या मरणासाठी तयार होतो. शायलॉकच्या मनात खुशीच्या उकळ्या फुटत असतात. दुसऱ्या बाजूला ती शायलॉकला दया [merci] या गुणावर एक मोठे प्रवचन ऐकवते. तर्कशुद्ध मांडणीचा तो एक उत्कृष्ट नमुना आहे. शायलॉक अर्थातच त्या विनवणीकडे दुर्लक्ष करतो व "मला फक्त न्याय हवा" [I want justice only] असा जप करत बसतो. आणि इथेच कथेचा परमोच्च बिंदु - climax - सुरू होतो. (हा भाग ओरिजिनल वाचायला हवा इतका तो उत्कट आहे)

पोर्शिया शायलॉकला विचारते, "मांसाचे वजन करायला तराजू आणलाय का?" तो म्हणतो "हो". मग ती विचारते, "डॉक्टरला बोलावले आहे का?" शायलॉक उत्तरतो, "तसे करारात लिहिलेले नाही". पोर्शिया म्हणते, "कायद्याप्रमाणे अगदी बरोबर". शायलॉक तिच्या वागण्यावर खूष होतो व "उत्कृष्ट न्याय" म्हणून तिची स्तुती करतो.

आता पोर्शिया त्याला कायद्याच्या शब्दात गुंडाळायला लागते. "हे पाहा मि. शायलॉक, एक लक्षात ठेवा, मांस काढताना रक्ताचा एक थेंबही येता कामा नये; करारात रक्त घेण्याची बोली नाही. आणि एक पौंड म्हणजे बरोबर एक पौंडच मांस काढले पाहिजे, जराही कमी नाही, जराही जास्त नाही."

हे ऐकल्याबरोबर शायलॉक गडबडतो व तो तिप्पट रक्कम घ्यायला तयार होतो, बसॅनिओही लगेच पैसे काढून त्याला द्यायला तयार होतो. पोर्शिया दोघांनाही थांबवते आणि म्हणते, "थांबा, हे पैसे त्यांनी आधीच नाकारले आहेत; आता त्यांना फक्त न्याय मिळेल". पोर्शिया शायलॉकला पुढे बजावते, "मि. शायलॉक, व्हेनीसचा कायदा बरोबर समजून घ्या. ख्रिश्चन रक्ताचा एक थेंब जरी सांडला तरी व्हेनीसच्या कायद्यानुसार तुमची सर्व मालमत्ता सरकारजमा होईल." हताश झालेला शायलॉक फक्त ३००० ड्यूकट घेऊन खटला मागे घेण्यास तयार होतो पण पोर्शिया "त्याने ही रक्कम आधीच नाकारली आहे" हे बजावून त्याचा प्रस्ताव फेटाळते व परत त्याला, "आता तुम्हाला फक्त न्यायच मिळेल" असे बजावते. कोंडीत सापडलेला शायलॉक तावातावाने "मला काहीच नको, मी जातो" असे म्हणून बाहेर पडायला जातो. पोर्शिया त्याला अडवते व आपल्या भात्यातला शेवटचा बाण काढते, "मि. शायलॉक, तुम्ही असे करू शकणार नाही. एका ख्रिश्चन नागरिकाचा तुम्ही जीव घेण्याचा प्रयत्न केला आहे, म्हणून व्हेनीसच्या कायद्यानुसार तुम्ही देहांत शिक्षेला पात्र आहात व तुमची सर्व मालमत्ता जप्त करून अर्धी अँटोनिओला व अर्धी सरकारजमा होईल. तुमची देहांताची शिक्षा फक्त ड्यूक साहेब माफ करू शकतात."

ड्यूक म्हणतो, "तुमची देहांताची शिक्षा मी माफ करत आहे, कारण आमचा कायदा तुमच्यासारखा हृदयशून्य नाही". अँटोनिओही आपल्या वाट्याची अर्धी मालमत्ता शायलॉकला परत करतो, पण मरणोत्तर ती त्याने आपली मुलगी जेसिका हिला द्यावी या अटीवर. पोर्शिया या सर्व दयेसाठी शायलॉकवर दोन अटी लादतेः १) त्याने ख्रिश्चन झाले पाहिजे, व २) मृत्युनंतर आपली सर्व मालमत्ता जेसिकाला द्यावी असे लेखी मृत्युपत्र करून दिले पाहिजे. ड्यूक या सर्व निवाड्यावर शिक्का मोर्तब करतो. शायलॉकला हे सर्व मान्य करावे लागते व खटला इथे संपतो. मुख्य गोष्टही इथेच संपते. पण शेक्सपियरने नेहमीप्रमाणे त्याला एक गंमतीचे शेपूट लावले आहे.

खटला संपल्यानंतर ड्यूक अँटोनिओला सुचवतो की त्याने त्याची बाजू मांडणाऱ्या वकिलाला [पोर्शियाला] काहीतरी भेट द्यावी; वकिलसाहेब पैसे नाकारतात. बसॅनिओच्या फारच आग्रहामुळे पोर्शिया त्याच्या बोटातील अंगठी मागते व तिची क्लार्क नेरिसाही ग्रॅशियानोला त्याची अंगठी मागते. आपापल्या पत्नींना दिलेले वचन आठवून दोघेही अंगठ्या द्यायला कां-कू करतात, पण अँटोनिओच्या आग्रहामुळे दोघांनाही आपल्या अंगठ्या देणे भाग पडते.

दुसरे दिवशी सकाळी बेल्मॉंटला सगळ्यांची एकत्र भेट होते. त्यावेळी बसॅनिओ व ग्रॅशियानो या दोघांच्याही बोटातील अंगठ्या गायब झालेल्या पोर्शिया व नेरिसा यांच्या लक्षात येते. त्या या दोघांच्यावर बेवफाईचा आरोप करतात; सफाई करता करता त्यांची तारांबळ उडते. अँटोनिओने खूप रदबदली केल्यानंतर दोघीजणी आपापल्या पर्समधून अंगठ्या बाहेर काढतात. आश्चर्य ओसरल्यानंतर सगळ्यांच्या लक्षात येते की कोर्टात शायलॉकला वादात नेस्तनाबूत करणारी व अँटोनिओला वाचवणारी पोर्शिया होती!

एक छोटे उपकथानकः शायलॉकची कन्या जेसिका हिचे लोरेंझो या ख्रिश्चन तरूणावर प्रेम असते, पण शायलॉक या लग्नाला संमती देत नाही. खटल्याच्या रात्री ती आपले सोन्याचे दागिने व खूप पैसे घेऊन लोरेंझोबरोबर पळून जाते. दोघेही गुप्तपणे लग्न करून पोर्शिया-बसॅनिओच्या आश्रयाला येतात. खटल्यामुळे त्यांना शायलॉकची मालमत्ता मिळते व त्यांचेही प्रेम सुखांतिक होते. शायलॉकही या सर्व शेवटाने समाधानी होतो व नाटक सर्वांना सुखी समाधान देऊन संपते.

०००००-----०००००

आपल्या प्रतिक्रिया/सूचना कळवाः
Phone: 020-25881194
Email: joshi.bindumadhav@gmail.com